# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २७/०१/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

दिनांक २६/०१/२०२२ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन चे डी.बी. पथकाचे प्रमुख सहा.पोलीस.निरीक्षक मनोज खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकाचे स्टाफ पोस्टे. परीसरात गस्त करीत असतांना त्यांना गुप्त माहीतगारा द्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन हददीत वरोडा गावामध्ये चहा पानठेला दुकान फोडणारे आरोपी शुभम हरीनखेडे याने आपला साथीदारा नामे रवि बिराहा राह. कळमेश्वर याचे सह मौजा वरोडा बस स्टॉप चे रोड चे बाजुला असलेले चाय पानठेल्याची दुकानाचे दरवाज्याचे कुलुप तोडुन चोरी करणारे आरोपी हे कळमेश्वर श्मशान भुमी जवळ फिरत आहेत. अश्या खबरे वरून पोलीस स्टॉफ सह गुप्त माहीतगारा दवारे मिळालेल्या माहीती नुसार खाजगी वाहनाने सांगितलेल्या ठिकाणी जावुन त्याचा शोध घेवुन वर नमुद आरोपीतांना ताब्यात घेतले व पोस्टे ला परत येवुन आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करून पोलीस कोठडी रिमांड दरम्यान सदर गुन्हयातील चोरीस गेलेल्या मुददेमाल १) गैस सिलेंडर किं. ३,०००/– रू. २) शेगडी किं. ३,०००/– रू. ३) व्हेपर्स किं. २,०००/– रू. ४) प्लॅस्टिक स्टुल ४ नग किं. १,०००/– रू. ५) चाय थर्मास किं. १,०००/– रू. ६) गोल्ड फ्लॅक सिगरेट पॅकेट ४ नग किं. २००/– रू. असा एकुण किं. १०,२००/– रू. चा मुददेमाल आरोपी क्र. (१) शुभम हरीनखेडे याने रवि बिरहा राह. कळमेश्वर तसेच राजा पुसदकर राह. कळमेश्वर याचे सह मिळुन चोरी केल्याचे कबुलीजवाबा मध्ये सांगितल्याने आरोपी नामे राजा पुसदकर रा. कळमेश्वर याचा शोध घेवुन त्यास सदर गुन्हयामध्ये अटक करण्याची तजबीज ठेवली असुन गुन्हयातील मुददेमाल जप्त करण्यात आला असुन तसेच आरोपी क्र. १. शुभम हरीनखेडे याने गुन्हयातील १ सिलेंडर बिरचंन्द्र रॉय, राह. डफ्क कळमेश्वर यास १,०००/– रू. मध्ये विकल्याचे सांगितल्याने बिरचंन्द्र बिलट रॉय, वय ४८ वर्ष राह. डोंगरे ले आऊट एमआयडीसी कळमेश्वर यास सदर सिलेंडर चोरीचा असल्याचे माहित असुन सुदधा त्याने सिलेंडर विकत घेतल्याने सदर गुन्हयात कलम: ४११ भा.द.वि. कलम वाढ करून आरोपी बिरचंन्द्र बिलट रॉय, राह. डोंगरे ले आऊट एमआयडीसी कळमेश्वर यास सदर गुन्हयात ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधाने विचारपुस करून त्यास मा. कोर्टात दोषारोप पत्र सादर करतेवेळी हजर राहण्याचे समज देवुन सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयातील आरोपी क्र. १ याने आपल्या कबुलीजवाबा मध्ये एक काळया रंगाची हिरो होण्डा स्प्लेंडर प्रो मोटरसायकल एमएच–४०/एच– ७८५६ असलेली तसेच कोंढाळी येथुन एक हिरो होण्डा पॅशन प्रो लाल रंगाची मोटरसायकल एमएच–३१/क्यु–८०७० असलेली असा असुन सदर मोटार सायकली बाबत विचारपुस केली असता आरोपीने मोटारसायकल क्र. १ ही कोंढाळी येथुन व मोटार सायकल क्र. २ ही रामटेक येथुन चोरी करून आणल्याचे सांगुन दोन्ही मोटारसायकल चे नंबर प्लेट बदली केलेले असल्याचे सांगितले दोन्ही मोटार सायकली जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलिस नाईक रवि मेश्राम मो.क्र. ९८२३४५१९३९ हे करित आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. विययकुमार मगर, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, प्रभारी ठाणेदार सपोनि प्रविण मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज खडसे यांचे नेतृत्वाखाली सहापोउपनिरी मन्नान नौरंगाबादे, पोलिस नाईक रवि मेश्राम, गणेश मुदमाळी, श्रीकांत बोरकर यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर